१९४१

जा.क्र उविम/मुळदे/ /२०२२
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.
दिनांक: 15 DEC 2022

प्रति,

.....................................
.....................................
.....................................

**विषय – राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत पणदूर येथील निवासी शिबिरासाठी चहा, बिस्किट, नाष्टा व जेवण पुरवण्याचे दरपत्रक देणेबाबत.........**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदेच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे विशेष श्रमसंस्कार शिबीर राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत निवासी शिबिर दि. २७ ते २९ डिसेंबर २०२२ या कालावधीत संविता आश्रम, पणदूर ता. कुडाळ येथे आयोजित करण्यात आले आहे. सदर निवासी शिबिरासाठी एकूण ४० स्वयंसेवक (विद्यार्थी–२० विद्यार्थीनी–२०) सहभागी होणार आहेत. या तीन दिवसासाठी दररोज सकाळचा नाष्टा, चहा, दुपारचे जेवण, संध्याकाळचा चहा व रात्रीचे जेवण इ. पुरविण्याचे दरपत्रक खालील तपशिलाप्रमाणे मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | दर (रू.) |
|---|---|---|
| १ | सकाळचा नाष्टा (३ दिवस ३ वेळा)<br>अ) पोहे<br>ब) उपीट<br>क) मिसळ पाव | प्रति प्लेट |
| २ | चहा (३ दिवस ६ वेळा) | प्रति कप |
| ३ | बिस्कीट पुडा (छोटा) (३ दिवस ३ वेळा) | प्रति नग |
| ४ | शाकाहारी जेवण (वरण भात, २ चपाती, दोन भाज्या, पापड, लोणचे) (३ दिवस ५ वेळा) | प्रति थाळी |

याबाबत आपणास विनंती करण्यात येते की, कृपया आपण वरील तपशिलाप्रमाणे **चहा, बिस्किट, नाष्टा व जेवण पुरविण्याचे दर** नमुद करुन याबाबतचे दरपत्रक या कार्यालयास **दि. २३.१२.२०२२ रोजी सायंकाळी** ५.०० वाजेपर्यंत जमा करावे. उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**दरपत्रकाबाबत अटी खालीलप्रमाणे.**

१) दरपत्रक बंद लखोटयातून सादर करावे व त्यावर **"चहा, बिस्किट, नाष्टा व जेवण पुरविण्याचे दरपत्रक"** असे स्पष्ट नमुद करावे.

२) दर पत्रकात दिलेले दर हे सर्व करांसहीत स्पष्टपणे नमुद करावे.

३) चहा, बिस्किट, नाष्टा व जेवण हे संविता आश्रम, पणदूर ता. कुडाळ येथे होणाऱ्या शिबीरासाठी पोहचविणे बंधनकारक राहील.

४) दरपत्रकात या पत्राच्या संदर्भाचा उल्लेख असावा.

५) दरपत्रकावर जी. एस. टी.नंबर नमुद करणे अत्यंत आवश्यक आहे.

६) टपालाद्वारे दरपत्रक पोहचण्यास विलंब झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

७) सर्व दरपत्रके मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.

आपला विश्वासू,

(सही)

सहयोगी अधिष्ठाता
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग